पोलीस स्टेशन, शिरखेड जि.अमरावती

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अमरावती ग्रामीण **P.S.(ठाणे):** शिरखेड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0196 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**05/05/2025 23:55

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 04/04/2025

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 04/04/2025

**Time From (वेळेपासून):** 15:41 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:58 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 05/05/2025 **Time (वेळ):** 22:35 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 037

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/05/2025 23:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 17 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तलाठी कार्यालय, साझा मंगरुळ भ,तामोर्शी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** शिरखेड

**District(State) (जिल्हा(राज्य)):** अमरावती ग्रामीण(महाराष्ट्र)



CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुनिल दामोधरराव ठवळी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1981

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मंगरुळ भिलापूर,ता मोर्शी ,शिरखेड ,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मंगरुळ भिलापूर,ता मोर्शी ,शिरखेड ,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9527709811

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रश्मी भाष्करराव काळे | | | 1. रासंगेकर अपार्टमेन्ट, गुलाब, चांदुरबाजार ,शिरखेड ,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



CamScanner

पोलीस स्टेशन, शिरखेड
जि. अमरावती



10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

हकिकत नक्कल लेखी फिर्याद मी दिनांक 04/04/2025 रोजी ला.प्र.वि.,कार्यालय, अमरावती येथील पो.नि.चित्रा मेसरे यांचेकडे लेखी तक्रार दिली होती की,मी वर नमुद ठिकाणी कुटुंबासह राहत असून शेती व्यवसाय करतो.माझे वडील दामोधर बाळकृष्ण ठवळी हे जुलै 2024 मध्ये मरण पावले असुन त्यांनी मरणाच्या 8 वर्षापुर्वी मृत्युपत्र लिहुन ठेवले होते व त्यांच्या नावावर असलेले मौजा मंगरूळ (भिलापुर) येथील 3 एक्कर शेत गट क्र.432 ही जमीन माझा मोठा मुलगा ईश्वर याचे नावे करून ठेवली होती, ती आता वडिलांच्या मृत्युनंतर माझा मुलगा ईश्वर याचे नावावर झालेली आहे. सदर जमिनीवर असलेले 1,20,000/-रूपयाचे कर्ज आम्ही दिनांक 18/03/2025 रोजी परतफेड केलेले असुन त्या शेतावर एच.डी.एफ.सी. बँकेमार्फत नविन 3,18,000/- रूपयाचे कर्ज घेण्याबाबत संपुर्ण प्रक्रिया पुर्ण केलेली आहे, फक्त जुन्या कर्जाचा बोझा 7/12 वर कमी केल्यावर एच.डी.एफ.सी. बँकेमार्फत मिळणारी 3,18,000/-रूपये नविन कर्जाची रक्कम माझे मुलाच्या ईश्वर याचे खात्यात जमा होणार आहे.
एच.डी.एफ.सी.बँकेने गहाणखत/बँक कर्ज बोझा नोंदविण्या बाबतचा अर्ज संबंधित तलाठी कार्यालयास देण्यासाठी आम्हास दिला होता. त्याअनुशंगाने दिनांक 01/04/2025 रोजी मी व माझा मुलगा ईश्वर असे तलाठी कार्यालय मंगरूळ (भिलापुर) येथे गेलो व तलाठी मॅडम रश्मी काळे यांना भेटलो व तलाठी रश्मी काळे मॅडमला मी म्हटले की, ''आमच्या शेतावरील असलेले 1,20,000/- रूपयाचे कर्ज आम्ही दिनांक 18/03/2025 रोजी परतफेड केलेले असल्याने आमच्या शेतावरील 7/12 वर जुन्या कर्जाचा बोझा कमी करून सदर शेतीवर नविन कर्ज एच.डी.एफ.सी. बँकेमार्फत आम्हास घ्यावयाचे असल्याने संपुर्ण प्रक्रिया पुर्ण केलेली असुन एच.डी.एफ.सी. बँकेमार्फत मिळणा-या नविन कर्जाबाबत शेताचे 7/12 वर नविन बोझा चढवायचा आहे. त्याकरिता एच.डी.एफ.सी.बँकेने आम्हास गहाणखत/बँक कर्ज बोझा शेताचे 7/12 वर नोंदविण्याबाबतचा अर्ज संबंधीत तलाठी कार्यालय येथे दयावयास सांगितले आहे. त्याकरिता आम्ही आपले तलाठी कार्यालयात आलो आहे'' असे म्हणुन एचडीएफसी बँकेने आम्हाला दिलेला अर्ज आम्ही तलाठी श्रीमती काळे यांना दिला. त्यावर मंगरूळ (भिलापुर) येथील तलाठी रश्मी काळे मॅडम यांनी आम्हाला म्हटले की,''तुमच्या शेतावर असलेला जुन्या कर्जाचा बोझा कमी करून नविन बोझा चढवायचा असेल तर मला 500/- रूपये दयावे लागेल'' परंतु मला माहिती आहे की, सदर कामाकरिता कोणतेही शुल्क आकारले जात नाही. तरी तलाठी रश्मी काळे मॅडम हयांनी मला आमच्या शेतावरील जुना कर्ज बोझा कमी करून नविन कर्ज बोझा शेताचे 7/12 वर चढविण्यासाठी 500/-रूपये लाचेची मागणी करीत आहे. तलाठी मॅडम रश्मी काळे यांना मला लाच देण्याची अजिबात इच्छा नाही तसेच माझा त्यांच्यासोबत व्यक्तीगत कुठलाही आर्थिक देण्याघेण्याचा व्यवहार नाही किंवा कुठलेही भांडण नाही तरी तलाठी मॅडम रश्मी काळे याचेवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी मी आपले कार्यालयात येवुन अशा आशयाची तक्रार स्वहस्ताक्षरात दिली होती.
मी दि.04/04/2025 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती येथील पो.नि.मेसरे यांनी दोन शासकीय पंच बोलाविले. त्यानंतर तलाठी कार्यालय मंगरूळ (भिलापुर) येथील तलाठी श्रीमती रश्मी काळे यांची लाचेची मागणी आहे किंवा नाही याबाबत पडताळणी कारवाई करण्याकरिता पंच क्रं. 1 म्हणुन श्री.संदिप झंवर व पंच क्रं. 2 म्हणुन श्रीमती शितल गांधी हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविले. त्यानंतर पो.कॉ. शैलेश कडू यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरचे प्रात्यक्षिक करून दाखवुन माझे व तलाठी श्रीमती रश्मी काळे यांच्यात भेटी दरम्यान होणारे संभाषण ध्वनिमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले.
त्यानंतर पो.नि.मेसरे यांनी मला पंचासमक्ष विचारले की, तलाठी कार्यालय मंगरूळ (भिलापुर) येथील तलाठी श्रीमती काळे हया तलाठी कार्यालयात हजर आहेत किंवा नाहीत तेव्हा मी त्यांना सांगितले की, तलाठी श्रीमती रश्मी काळे हया तलाठी कार्यालय मंगरूळ (भिलापुर) येथेच हजर आहेत. त्यानंतर पो.नि.मेसरे यांचे सुचनेप्रमाणे मी व पंच आणि सापळा पथक शासकिय वाहनाने तलाठी कार्यालय मंगरूळ (भिलापुर) गावाचे अलीकडे निर्जनस्थळी गेलो. त्यानंतर पो.नि. मेसरे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी व पंच क्रं. 1 श्री.झंवर दुचाकीने तलाठी कार्यालय मंगरूळ (भिलापुर)



CamScanner

येथे गेलो असता तेव्हा माझी व तलाठी श्रीमती काळे यांची भेट झाली भेटीदरम्यान तलाठी श्रीमती काळे यांनी मला माझे शेतावरील 7/12 वर असलेला बोझा उतरविणे व चढविण्याकरिता 500/- रू.लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम सोमवार दि.07/04/2025 रोजी दिले तरी चालेल असे म्हणुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरून दिनांक 07/04/2025 रोजी तलाठी कार्यालय मंगरूळ (भिलापुर) येथील तलाठी श्रीमती काळे यांचेविरूध्द सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले होते.

त्यानंतर दिनांक 07/04/2025 रोजी सापळा कार्यवाही करावयाची असल्याने पो.नि.चित्रा मेसरे यांनी मला 500/- रू. हजर करण्यास सांगितले असता, मी, लाच रक्कम म्हणुन देण्याकरिता 500/- रू. दराची एक नोट एकुण 500/- रू. हजर केले. सदर नोटचा क्रमांक एका कागदावर लिहीण्यात आल्यावर पोहेकॉ प्रमोद रायपुरे यांनी मला व पंचाना ॲन्थ्रॉसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प यांचे गुणधर्म सांगुन त्यांचे प्रात्यक्षिक करवुन दाखविले व नोटाला ॲन्थ्रॉसीन पावडर लावण्यात आली. तसेच तलाठी श्रीमती काळे यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर माझे डोक्याला बांधलेला दुपट्टा काढावा व दुपटटयाने तोंड पुसावे असा लाच स्विकारल्याचा नियोजीत इशारा करून लाच स्विकारल्याची खात्री करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर मी माझा मुलगा नामे ईश्वर ठवळी याला मोबाईल फोनद्वारे तलाठी श्रीमती काळे हया तलाठी कार्यालय मंगरूळ (भिलापुर) येथे हजर आहेत का? अशी विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, तलाठी श्रीमती काळे मॅडम हया तलाठी कार्यालयात अदयाप पावेतो आल्या नाहीत. त्यामुळे काही वेळ तलाठी श्रीमती काळे हया तलाठी कार्यालयात येण्याची वाट पाहीली परंतु त्या तलाठी कार्यालयात हजर नसल्याने सदर कार्यवाही तात्पुरती स्थगीत करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर पो.नि.चित्रा मेसरे यांनी आम्हास सूचना दिल्या की, ज्यावेळी लोकसेवक हया त्याचे तलाठी कार्यालय मंगरूळ (भिलापुर) येथे हजर असतील किंवा लोकसेवक रश्मी काळे यांचा तक्रारदार यांना फोन येईल त्यावेळी सापळा कारवाई करण्यात येईल,असे ठरविण्यात आले होते.

त्यानंतर दि.28/04/2025 रोजी अंदाजे दुपारी 12/25 वा मी, पो.नि. चित्रा मेसरे यांना फोनद्वारे कळविले की, मी आजारी असल्याने काही दिवस दवाखान्यात ईलाजाकरिता भरती होतो व त्यादरम्यान मी, तलाठी श्रीमती रश्मी काळे यांचेबाबत माझे मुलाकडुन माहिती घेतली असता मला समजले की, मधल्या काळात सार्वजनिक सुट्टया आल्यामुळे श्रीमती रष्मी काळे हया तलाठी कार्यालय मंगरूळ (भिलापुर) येथे हजर आल्या नाहीत व माझी प्रकृती ठिक झाल्यावर मी स्वतः तलाठी काळे हया कार्यालयात हजर आहेत की नाही याबाबत तलाठी कार्यालय मंगरूळ (भिलापुर) येथे जावुन पाहणी केली असता मला समजले की, तलाठी श्रीमती रश्मी काळे हया मागील काही दिवसांपासुन तलाठी कार्यालय अडगाव येथुनच शासकिय कामकाज करीत आहेत अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने मी दिनांक 28/04/2025 रोजी तलाठी श्रीमती रश्मी काळे हया अडगाव येथील तलाठी कार्यालयात हजर असल्याबाबत पो.नि.चित्रा मेसरे यांना मोबाईल फोनद्वारे कळविले आहे म्हणुन दि.28/04/2025 रोजी सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर ॲन्थ्रॉसीन पावडर लावण्यात आलेली लाचेची रक्कम 500/- रू. माझे शर्टाचे डाव्या खिशामध्ये ठेवण्यात आली व व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन रेकॉर्डर सुरू करून माझेजवळ देण्यात आले. त्यानंतर मला पंच क्रं. 1 श्री.झंवर यांच्यासह माझे चारचाकी वाहनाने तलाठी कार्यालय अडगाव येथे रवाना केले. आमचे मागेमागे सापळा पथक पंच क्रमांक 2 श्रीमती संगिता दोशी सह शासकिय वाहनाने रवाना होवून तलाठी कार्यालय अडगाव चे अलीकडे आळीपाळीने उतरून व पायदळ जावुन तलाठी कार्यालयाच्या आजुबाजुला कोणालाही शंका येणार नाही अशा पध्दतीने सापळा लावुन थांबलो. मी व पंच क्रं. 1 श्री.झंवर यांचेसह तलाठी कार्यालय अडगाव येथे गेलो तेव्हा तलाठी श्रीमती काळे यांची भेट झाली असता त्यांनी मला म्हटले की, '' हाच आहे तो...तक्रार देणारे'' असे म्हटले त्यावर मी त्यांना म्हटले की, '' तक्रार देली कुठ नाव त सांगा... सिध्द करून दाखवा लागल ना..'' असे म्हटले असता त्यांनी मला '' निघते बाहेरून तोच काढा म्हणा... निघते सातबा-याच्या साईड वर जाय... चालु आहे... बाहेरून निघते काढुन घ्या...'' असे म्हटले त्यावर मी त्यांना '' बर ठिक आहे ना मग... ते देवुन देवु काय मग...'' असे म्हटले असता त्यांनी मला ''नाही'' असे म्हणुन लाच रक्कम स्विकारण्यास नकार दिला. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 श्री.झंवर यांचेसह तसेच सापळा पथक यापुर्वी थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो व त्यानंतर ॲन्थ्रॉसीन पावडर लावलेली लाच रक्कम 500/- रू. मी पो हे कॉ प्रमोद रायपुरे यांचेजवळ दिली. त्यावेळी पो.नि. चित्रा मेसरे यांनी सदरची सापळा कार्यवाही तात्पुरती स्थगीत करण्याचे सांगुन ज्यावेळी तलाठी श्रीमती काळे तलाठी कार्यालयात हजर असतील त्यावेळी पुढील कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले होते.

त्यानंतर आज पर्यत तलाठी श्रीमती रश्मी काळे यांची तलाठी कार्यालय मंगरुळ(भिलापुर) येथे येण्याची वाट पाहली. परंतु तलाठी श्रीमती रश्मी काळे मॅडम या गावामध्ये आल्या नाही. तसेच दि.28/04/2025 रोजी सापळा कार्यवाही दरम्यान त्यांनी माझेकडे पाहून ''हाच आहे तो तक्रार देणारे'' असे म्हणून माझे कडून लाच रक्कम स्विकारण्यास



CamScanner

नकार दिला. यावरून तलाठी श्रीमती रश्मी काळे मॅडम यांना माझेवर संशय आल्याने त्यांनी माझ्याकडुन लाचेचे 500 रुपये स्विकारण्याचे टाळले व ते आता माझ्याजवळून लाच रक्कम स्विकारणार नाही याची मला खात्री झाल्याने त्यांचेवर मी दिलेल्या तक्रारीवरुन योग्य ती कार्यवाही करावी याबाबत मी आज रोजी निवेदन दिले.
एकंदरीत माझे मुलगा ईश्वर ठवळी याचे नावावर असलेल्या शेताचे 7/12 वर जुना कर्जाचा बोजा कमी करुन नवीन कर्जाचा बोजा शेताचे 7/12 वर चढविणेकरीता तलाठी श्रीमती रश्मी भाष्करराव काळे, वय 39 वर्ष, पद तलाठी, साजा मंगरुळ (भिलापुर) वर्ग - 3 रा.संगेकर अर्पाटमेंन्ट, गुलाबराव महाराज नगर, चांदुरबाजार जि.अमरावती यांनी मला 500/- रु. लाचेची मागणी केली. परंतु त्यांना माझेवर संशय आल्याने त्यांनी माझेकडून लाचेची रक्कम स्विकारली नाही. याची मला खात्री झाल्याने त्यांचेविरुध्द पुढील कायदेशिर कार्यवाही होणेकरीता माझी फिर्याद आहे.
माझी वरील नमुदप्रमाणे फिर्याद संगणकावर टंकलिखित केली असुन मी वाचुन पाहिली घडलेल्या घटनेनुसार बरोबर व खरी आहे. सही इंग्रजीत अस्पष्ट अशा वरीलप्रमाणे दिलेल्या लेखी फिर्यादी वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
SACHIN KISANRAO LULE
**Rank (पद):** I (Inspector) **No.(क्र.):** POBN81864
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



CamScanner